# कार्यालय, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती (महाराष्ट्र)

जा.क्र.शि/अधि/प्र.शा.५/.२८३../२०२१ दि.२९/१/२०२१

तात्काळ/कालमर्यादा

प्रति,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा संचालित
सर्व महाविद्यालयांचे/इतर संस्थांचे प्राचार्य व
प्राथमिक,माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका .

**विषय :– दर वर्षी प्रमाणे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन करून पाठविण्याबाबत.**
संदर्भ :– मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.१३०२/२०२० दिनांक ७/१२/२०२० कार्यालयास प्राप्त ८.१.२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भातील पत्रानुसार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,अमरावती यांनी संस्थेच्या कार्यालयास कळविले की,२०२० चा **सशस्त्र सेना ध्वजदिन निधी** संकलन करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने अमरावती जिल्ह्यास रू ९९,६०,०००/– चे उद्दिष्टे दिलेले आहे. मातृभूमीच्या रक्षणाकरीता आत्मबलिदान करून वीरगती लाभलेल्या लष्करातील जवानांच्या बलिदानाची परतफेड या निमित्त का होईना ही संधी प्राप्त झाली आहे. जवानांच्या कुटूंबियांचे/अवलंबितांचे पुर्नवसन करण्याकरीता यापुर्वीही ध्वजदिन निधी आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण सर्व मिळून मोठे योगदान दिले आहे. आपल्या सहकार्यामुळे आपल्या संस्थेचे नांव देशातील काना कोप–यात राहणा–या व देशाची सेवा करणा–या सैनिकांपर्यंत पोहचलेले आहे. संस्थेच्या भरीव योगदानाची महाराष्ट्र शासनाने दखल घेवून उत्कृष्ट कामगीरी केल्याबद्दल संस्थेला गौरविण्यात आलेले असुन ही बाब आपणा सर्वांचे दृष्टीने गौरवाची आहे.

याही वर्षी ध्वजदिन निधी शुभारंभ दि.७ डिसेंबर,२०२० ला करण्यात आलेला आहे . युध्दक्षेत्रात किंवा अतिरेकी कारवायांमध्ये शहीद झालेले, अपंगत्व आलेले जवान तसेच माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांच्यासाठी महाराष्ट्र शासन निरनिराळ्या कल्याणकारी योजना राबवित आहे. या योजनेकरीता येणारा खर्च भागविण्याकरीता हा ध्वजदिन निधी पुरक ठरतो. हा एक राष्ट्रीय कार्यक्रम आहे व ह्या कार्यात आपणा सर्वांचा मोलाचा वाटा आवश्यक आहे. त्याकरीता हा ध्वजदिन निधी अल्पावधीत म्हणजे **दि.२६ जानेवारी,२०२१** पूर्वीच गोळा करावा म्हणून मा.जिल्हाधिकारी यांनी संदर्भातील पत्रान्वये आदेशित केलेले आहे.

**आपणांस संदर्भातील पत्राच्या अनुषंगाने** विनंती करण्यात येते की, ह्या ध्वजदिन निधीमध्ये आपले/ आपल्या **शाळा/महाविद्यालयातील कर्मचा–यांचे व सर्व विद्यार्थ्यांचे** १०० % योगदान असणे अतिशय महत्वाचे आहे आणि याची जाणीव सर्व **कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनींना करून** देवून त्यांना ह्या राष्ट्रीय कार्यक्रमात प्रोत्साहीत करून त्यांचे योगदान असणे गरजेचे आहे. **म्हणून .आपण व आपल्या अधिनस्त असलेल्या** सर्व कर्मचा–यांकडून व विद्यार्थी ,विद्यार्थीनी कडून खाली दर्शविल्या प्रमाणे **ध्वजदिन निधी खालील प्रमाणे गोळा** करावा व संस्था कार्यालयात दिनांक १५/२/२०२१ पर्यंत जमा करून पावती घ्यावी. संस्थेच्या शाळा/महाविद्यालये/वसतीगृहे यांच्याकडून एकत्रित संकलीत झालेला निधी मा.अध्यक्ष यांचे हस्ते प्रदान करण्यांत येईल. त्यामुळे प्राचार्य,मुख्याध्यापकांनी संकलीत झालेला ध्वजदिन निधी परस्पर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात जमा करू नये, याची नोंद घ्यावी .

| अ.क्र. | तपशील | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | प्राचार्य | रू १५००/– |
| २ | वरीष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक | रू १०००/– |
| ३ | मुख्याध्यापक /क.म.शिक्षक/एमसीव्हीसी शिक्षक | रू ८००/– |
| ४ | माध्यमिक/प्राथमिक शिक्षक/एमसीव्हीसी निदेशक | रू ५००/– |
| ५ | अधिक्षक,मुख्य लिपीक,वरिष्ठ लिपीक, प्र.शाळा सहा. | रू ४००/– |
| ६ | कनिष्ठ लिपीक/ग्रंथालय लिपीक, प्र.शा.परिचर/चालक/शिपाई | रू ३००/– |
| ७ | विद्यार्थी वर्गमध्ये या राष्ट्रीय कार्याचे महत्व रूजावे या हेतुने त्यांचेकडून प्रत्येक विद्यार्थी | रू १०/– |

वर दर्शविल्याप्रमाणे आपण व आपल्या अधिनस्त असलेल्या पद निहाय्य कर्मचा–यांकडून तसेच शाळा/महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकडून दर्शविल्याप्रमाणे निधी गोळा करावा. प्राप्त झालेला निधी कर्मचा–यांची व विद्यार्थ्यांची व्दि प्रतीत यादी तयार करून सदर यादीमध्ये संबंधीत कर्मचा–यांचे नांव, पदनाम व रक्कम तसेच विद्यार्थ्याच्या यादीमध्ये विद्यार्थ्याचे नांव व शिकत असलेला वर्ग नमुद करावा. अशा प्रकारच्या नमुन्यातील यादीच्या दोन प्रती तयार कराव्यात व जमा झालेली रक्कम संस्थेच्या मुख्य कार्यालयातील लेखा विभागात दिनांक **१५/२/२०२१** ला खास दुता मार्फत पाठवावी. ह्या कामास कृपया प्राधान्य द्यावे. जवानाप्रति आस्था,प्रेम दाखविण्याची आलेली ही सधी गमावता कामा नये.

सचिव,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

प्रत माहितीकरीता सविनय सादर :–
१.मा.अध्यक्ष,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहितीसाठी सविनय सादर.
२.मा.विभागीय आयुक्त,अमरावती/नागपूर यांना माहितीकरीता सादर.